| | |
|---|---|
| MHKO070017902025 | **<u>रे.क.नं.१७८/२०२५</u>**<br>दादा आण्णा हुक्कीरे<br>विरुध्द<br>श्रीमती सुशिला आण्णा हुक्कीरे आणि इतर |

<u>निशाणी क्र.२६ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द करुन कैफियत देणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, यातील वादी यांनी प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतीच्या हक्कज्ञापनाकरिता व कब्जा मागणीकरीता दाखल केला असुन यातील प्रतिवादी क्र.१ या वादी यांच्या जनक आई असुन प्रतिवादी क्र.३ ते ५ व वादी हे सख्खे भाऊ, बहीण आहेत. यातील प्रतिवादी क्र.१ या वयोवृध्द असुन त्यांचे वृध्दपकाळामुळे प्रतिवादी क्र.१ या वारंवार आजारी असतात. तथापि यातील प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचेवरती प्रतिवादी क्र.१ यांचा दैनंदीन जीवनक्रम व उपजिवीका अवलंबुन असते. यातील प्रतिवादी क्र.३ ते ५ यांना प्रतिवादी क्र.१ यांचे आजारपणामुळे व वृध्दपकाळामुळे यातील प्रतिवादी क्र.३ ते ५ यांना प्रतिवादी क्र.१ यांची सेवासुश्रुषा करावी लागते. त्यामुळे यातील प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांना वेळेत वकीलांची भेट घेवुन प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.१ व ३ ते ५ यांना कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे मे. कोर्टांनी दि.२०/११/२०२५ इ. रोजी प्रतिवादी क्र.१, ३ व ४ यांचेविरुध्द व दि.११/१२/२०२५ इ. रोजी प्रतिवादी क्र.५ यांचेविरुध्द No WS चा हुकूम केलेला आहे. यातील प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांनी प्रस्तुतकामी कैफियत दाखल करणेस कोणताही जाणुनबुजून विलंब केलेला नाही. तथापि यातील प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांच्या वर नमुद संयुक्तीक कारणामुळे वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. यातील प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांचविरुध्द मे. कोर्टांनी दि.२०/११/२०२५ व दि.११/१२/२०२५ इ. रोजी पारित केलेला No WS चा हुकूम set aside करुन यातील प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांची कैफियत प्रस्तुत कामी समाविष्ठ करुन घेतलेस दावा मिळकतीसंदर्भात वादी व प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांचे दरम्यानची खरी वस्तुस्थीती मे. कोर्टासमोर येणार असुन सदरच्या वस्तुस्थीतीमुळे मे.

कोर्टांना न्यायनिर्णयास मदत होणार आहे. सबब मे. कोर्टांनी दि.२०/११/२०२५ इ. रोजी प्रतिवादी क्र.१, ३ व ४ यांचेविरुध्द व दि.११/१२/२०२५ इ. रोजी प्रतिवादी क्र.५ यांचेविरुध्द केलेला No WS चा हुकूम set aside करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** वादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे नोंदवुन कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांनी दिलेला अर्ज, त्यातील मजकुर प्रस्तुत वादी यांना मान्य नाही, कबुल नाही. प्रतिवादी यांना दि.२२/०८/२०२५, २५/०८/२०२५ रोजी दावेचे समन्स लागु झाले आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना मे. कोर्टांनी कैफियत/म्हणणे दाखल करणेस पुरेसा वेळ व संधी दिली होती. परंतू प्रस्तुत प्रतिवादी यांना वेळेत कैफियत/म्हणणे न दिलेने प्रतिवादी विरुध्द No WS चा हुकूम केला आहे. प्रतिवादी यांनी कायदयातील तरतुदीप्रमाणे ३० दिवसात व योग्य कारण दिलेस ९० दिवसामध्ये कैफियत दाखल आवश्यक आहे. प्रतिवादी यांना दावेचे समन्स वर कथन केलेप्रमाणे दि.२५/११/२०२५ पर्यंत कैफियत देणे आवश्यक होते. प्रतिवादी यांनी दि.०५/०१/२०२६ रोजी कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादीस कैफियत दाखल करणेस जवळजवळ ८५ दिवसांचा विलंब झाला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी विलंब माफी होवुन मिळणेबाबत अर्जच दिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी जोपर्यंत विलंब माफीचा अर्ज देत नाहीत तोपर्यंत प्रतिवादीची कैफियतीबाबत विचार करता येणार नाही. सबब सदर कथन व सर्व कारणांचा विचार होवुन प्रतिवादी यांचा नि.क्र.२६ कडील अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द हक्कज्ञापन व कब्जासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादीस कैफियत दाखल करणेसाठी उशीर झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांची कैफियत रेकॉर्डवर आल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसून केसच्या दोन्ही बाजू मे.कोर्टासमोर येवून न्यायदानास मदतच होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज हा मंजूर करुन प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांची कैफियत स्विकारणे आवश्यक आहे. प्रत्येक दावा हा गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जातील कारण पाहता प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांना संधी देणे हे विधीसंगत दिसून येत आहे. तसेच प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांना कैफियत दाखल करणेस संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने वादीला खर्च देणे देखील गरजेचे आहे.

सदर विलंब हा जास्त कालावधीचा नाही. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो –

– **आदेश** –

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.२६) हा प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांनी खर्च म्हणून वादी यांना र.रू.२००/– (र.रु.दोनशे फक्त) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांची कैफियत खर्चाची पुर्तता झाल्यास अभिलेखावर घेणेत यावी.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.01.22 17:40:38 +0530

दि.२२/०१/२०२६ **(अ.त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर,ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 22/01/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 22/01/2026. |
| Judgment/order uploaded on | 22/01/2026. |